<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.१९४/२०१५ निशाणी ९१ लगत आदेश</u>

(बंडु रामचंद्र गव्हाणे वि. भिमराव रामचंद्र गव्हाणे व इतर)

**CNR No. MHSO20-000785-2015**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ व २८ यांचेतर्फे विनंती अर्ज की, प्रतिवादी क्र. ४२ यांनी सदर दाव्याचे कामी प्रतिदावा दाखल केला होता. परंतु, प्रतिवादी क्र. ४२ यांनी प्रतिदाव्याची नक्कल दिली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व २८ यांना वेळेत त्यांची म्हणणे व कैफीयत देता आली नाही. दरम्यानचे काळात कोवीड १९ चे संसर्गामुळे महत्वाची कागदपत्रे व नकला मिळालेल्या नव्हत्या. त्यामुळे सदर प्रतिदाव्यास म्हणणे-कैफीयत देण्यासाठी त्यांना सुमारे एक वर्षाचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा जाणुनबुजून केलेला नाही. यातील प्रतिवादी यांचे सदर दावा मिळकतीत मौल्यवान हक्क गुंतलेले आहेत. त्यामुळे सदरचा विलंब माफ होऊन म्हणणे-कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळावी ही विनंती.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र. ४२ तर्फे म्हणणे दिले आहे की, प्रतिवादी क्र. २ व २८ चा अर्ज खरा व नाही व तो मान्य नाही. त्यामुळे न्यायाचे हुकूम व्हावेत अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ व २८ यांना प्रस्तुत दाव्यास कोरोना विषाणुचे प्रादुर्भावामुळे कागदपत्रे मिळवुन सदर दाव्यास मुदतीत म्हणणे-कैफीयत दाखल करता आलेले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना म्हणणे-कैफीयत आदेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा दावा प्रतिदाव्यातील वादींनी प्रतिवादींविरुध्द वाटप होऊन पृथ्थक कब्जा मिळणेसाठी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील मागणी

पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. परंतु, विलंब माफ केल्याशिवाय प्रतिवादीं क्र. २ व २८ यांना त्यांची कैफीयत दाखल करणे शक्य नाही. तसेच विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च प्रतिवादीवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो -

आदेश

१. अर्ज (नि.९१) प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. २ व २८ यांनी दाव्यातील प्रतिवादी क्र.४२ यांना खर्चाची रक्कम ४००/- पुढील तारखेपर्यत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ व २८ यांना म्हणणे-कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.22 14:49:27 +0530

सांगोला.
दिनांक – २०/०७/२०२२

( सौ. एस. के. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.& J.M.F.C.,Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 21/07/2022 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 21/07/2022 |